St
P

Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near
Balchitrawani, Behind Agharkar Research
Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,
१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च
इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 Fax : 25665807 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

जा. क्र.रा.मं./परीक्षा-८/७33
दिनांक - १०/०२/२०२३

प्रति,

१) मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०००३२
२) मा. विभागीय प्रसिध्दी उपसंचालक,पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण
३) मा. संचालक,दूरदर्शन केंद्र,वरळी,मुंबई-४०००३०
४) मा. संचालक,आकाशवाणी,मुंबई केंद्र, नवीन प्रसारण भवन, बॅकबे रेक्लेमेशन, आमदार निवासाजवळ, मुंबई-४०००२०
५) मा. संचालक,आकाशवाणी केंद्र
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/जळगांव/रत्नागिरी/सांगली/कोल्हापूर/सातारा/सोलापूर/नाशिक
६) सर्व जिल्हा प्रसिध्दी अधिकारी
७) मा. संपादक, सर्व वृत्तपत्र/ वृत्तवाहिन्या

**विषय:-** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) फेब्रुवारी–मार्च २०२३ परीक्षेपासून प्रश्नपत्रिका दहा मिनिटे अगोदर वितरीत करणेची कार्यपध्दती बंद करण्याबाबत.

महोदय,

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) फेब्रुवारी–मार्च २०२३ परीक्षेपासून प्रश्नपत्रिका दहा मिनिटे अगोदर वितरीत करणेची कार्यपध्दती बंद करण्याबाबतचे प्रकटन सोबत जोडले आहे.

सदर प्रकटनास आपल्या कार्यक्षेतील वृत्तपत्र, वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रांनी त्यांच्या वृत्तपत्रात/ प्रादेशिक बातम्यांचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

आपली विश्वासू,

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे - ०४

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण विभागीय मंडळ,
पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण त्यांनी स्थानिक स्तरावर प्रकटन प्रसिध्द करावे. व सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांच्या निदर्शनास आणावे.
२) व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ,पुणे
३) अस्वीस व सस्वीस राज्यमंडळ, पुणे ४) ग्रंथालय, राज्यमंडळ, पुणे ५) ऑनलाईन विभाग

**प्रत माहितीसाठी सविनय सादर-**

१) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२
२) मा. खाजगी सचिव, मा. मंत्री, शालेय शिक्षण विभाग. मंत्रालय,मुंबई-४०००३२
३) मा. खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री, शालेय शिक्षण विभाग. मंत्रालय,मुंबई-४०००३२
४) मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग , मंत्रालय, मुंबई-४०००३२
५) मा. आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, शिक्षण आयुक्तालय, पुणे-४११००१

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४.

## प्रकटन

**विषय :–** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) फेब्रुवारी–मार्च २०२३ परीक्षेपासून प्रश्नपत्रिका दहा मिनिटे अगोदर वितरीत करणेची कार्यपध्दती बंद करण्याबाबत.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेस प्रविष्ट होणा–या परीक्षार्थ्यांना प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी (आकलन होण्यासाठी) परीक्षा दालनात प्रश्नपत्रिकांचे वाटप परीक्षेच्या निर्धारीत वेळेपूर्वी दहा मिनिटे अगोदर करण्यात येत होते.

परंतु प्रश्नपत्रिका मोबाईलवर तसेच अन्य समाज माध्यमातून व्हायरल झाल्याच्या अफवा व काही अंशी अशा घटना निदर्शनास आलेल्या आहेत. इ. १० वी व इ. १२ वी च्या परीक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनातील एक महत्वपूर्ण टप्पा असल्यामुळे पालक व समाज घटक यांचे या परीक्षांकडे बारकाईने लक्ष असते. पेपरफुटीच्या अशा अफवांमुळे परीक्षार्थ्यांच्या मनात संभ्रम निर्माण होतो. तसेच यामुळे मंडळाची प्रतिमा जनमानसात मलिन होते. यापूर्वी परीक्षा दालनात परीक्षार्थ्यांना परीक्षा सुरू होण्यापूर्वी १० मिनिटे अगोदर प्रश्नपत्रिकांचे वितरण केल्यामुळे परीक्षा केंद्रावर निर्धारीत वेळेनंतर पोहोचणा–या विद्यार्थ्यांच्या मोबाईलमध्ये प्रश्नपत्रिकेचा आशय आढळून आल्याच्या घटना निदर्शनास आलेल्या आहेत.

अशा प्रकारच्या घटनांना प्रतिबंध व्हावा तसेच परीक्षा निकोप, भयमुक्त व कॉपीमुक्त वातावरणात सुरळीत पार पडाव्यात यासाठी परीक्षेच्या निर्धारीत वेळेपूर्वी दहा मिनिटे अगोदर प्रश्नपत्रिका वितरीत करण्याची सुविधा फेब्रुवारी–मार्च २०२३ परीक्षेपासून रद्द करण्यात येत आहे.

सर्व परीक्षार्थ्यांनी परीक्षेच्या निर्धारीत वेळेपूर्वी किमान अर्धा तास अगोदर परीक्षा केंद्रावर पोहोचण्याच्या सूचना शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत परीक्षार्थ्यांना देण्यात आलेल्या आहेत. तसेच परीक्षार्थ्यांना देण्यात आलेल्या प्रवेशपत्रातही (Hall Ticket) नमूद करण्यात आले आहे. सकाळ सत्रात स. १०.३० वाजता तसेच दुपार सत्रात दु. २.३० वाजता परीक्षा केंद्रावर परीक्षार्थ्यांने उपस्थित राहणे आवश्यक आहे.

फेब्रुवारी–मार्च २०२३ परीक्षेपासून सकाळ सत्रात स. ११.०० वाजता तसेच दुपार सत्रात दु. ३.०० वाजता परीक्षा दालनात प्रश्नपत्रिकांचे वितरण करण्यात येईल.

परीक्षा दालनात ज्या क्रमाने परीक्षार्थ्यांना प्रश्नपत्रिकांचे वाटप होईल, त्याच क्रमाने परीक्षेचा कालावधी संपल्यानंतर लिखित उत्तरपत्रिका परीक्षार्थ्यांकडून गोळा करण्याच्या सूचना सर्व दालन पर्यवेक्षकांना संबंधित परिरक्षक व केंद्रसंचालक यांचेमार्फत देण्यात येणार आहेत.

स्वाक्षरीत

**(अनुराधा ओक)**

**सचिव,**

**राज्य मंडळ, पुणे ४.**